| | |
|---|---|
| दाखल तारीख | २८.०१.२०२५ |
| नोंदणी तारीख | २८.०१.२०२५ |
| निकाल तारीख | १५.०७.२०२६ |
| कालावधी | वर्ष महिना दिवस |
| | **०१ ०५ १७** |

**मुख्य न्यायदंडाधिकारी, कोल्हापूर यांचे न्यायालयात**

(**पीठासीन अधिकारी मंगल दीपक कश्यप**)

**नियमित फौजदारी खटला क्र.१०१/२०२५.**

**CNR No.MHKO030015842025** **निशाणी क्र.२०/ब.**

**गुन्हा क्रमांक १८/२०२४.**

| | |
|---|---|
| **महाराष्ट्र शासन तर्फे शाहूपुरी पोलीस ठाणे, कोल्हापूर.** | **.. अभियोग पक्ष** |

***विरुध्द***

| | |
|---|---|
| आकाश आनंदा भोसले,<br>वय : २८ वर्षे, धंदा : व्यापार,<br>रा. कावळा नाका, माडवाला वसाहत,<br>कोल्हापूर. | **.. आरोपी** |

.......................................................................................................

अभियोगपक्षातर्फे सरकारी अभियोक्ता – श्रीमती एस. ए. ठोकळ.

आरोपीतर्फे विधिज्ञ – श्री.एस. आर. गणेशाचार्य.

.......................................................................................................

# <u>न्यायनिर्णय</u>

( दिनांक १५.०७.२०२६ )

आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान,१८६० मधील कलम ३८४, ३८६, ५०४ व ५०६ खालील गुन्ह्यांसाठी दोषारोप ठेवण्यात आलेला आहे.

**२.** अभियोगपक्षाची थोडक्यात हकिकत अशी की, फिर्यादीने पोलिस स्टेशनला हजर राहून अशी फिर्याद दिली व त्यामध्ये असे नमूद केले की, गेल्या २५ वर्षापासून त्याचा वडीलोपार्जित बिर्यादीचा गाडा 'ए–वन बिर्याणी' या नावाने सीबीएस बस स्टॅण्ड कोल्हापूर येथे आहे. वडील वयस्कर असल्याने गेल्या ६ वर्षापासून फिर्यादी स्वतः व्यवसाय करतो त्याच्या व्यवसायाची वेळ सायंकाळी ४.०० ते रात्री ११.०० पर्यंत असते.

**३.** गेल्या तीन वर्षापासून आकाश नावाचा व्यक्ती फिर्यादीच्या बिर्याणीच्या गाडीवर येवून बिर्याणी आणि मासे खावून पैसे न देता वरचेवर निघून जातो. पैसे मागितल्यास दमदाटी करुन 'मी कोण आहे ते तुला माहित नाही का ' असे म्हणून दादागिरी करतो. त्याने आत्तापर्यंत तीन ते चार हजारांची बिर्याणी व मासे खाल्लेले आहेत आणि पैसे दिलेले नाहीत. दमदाटी केल्यामुळे फिर्यादीने भितीपोटी कुठेही तक्रार दिलेली नव्हती.

४. दिनांक ०३.०१.२०२४ रोजी रात्री ९.०० च्या सुमारास आकाश हा फिर्यादीच्या बिर्याणी गाडीवर आला आणि दमदाटी करुन २५०/– रुपयांची बिर्याणी व मासे खावून पैसे न देता निघून जात असता फिर्यादीने त्याच्याकडे पैसे मागितले असता त्याने तो कोण आहे हे फिर्यादीला माहित आहे का, तो भाई आहे, पैसे मागितले तर याद राख, बिर्याणीचा गाडा फोडून टाकीन आणि राजारामपुरीतील बेकरीवाल्यासारखे फिर्यादीचे हातपाय मोडून मारेल अशी धमकी दिली आणि पैसे न देता निघून गेला. त्याच्या रोजच्या त्रासाला कंटाळून प्रस्तुतची फिर्याद दाखल केली.

५. वरील फिर्यादीवरुन शाहुपुरी पोलिस ठाणे येथे गु.र.नं १८/२०२४ भारतीय दंड संहीतेमधील कलम ३८४, ३८६, ५०४, व ५०६ खाली गुन्हा नोंदविण्यात आला आणि तपास श्री.एस. एम कळंत्रे, पोलिस हेड कॉन्स्टेबल यांच्याकडे देण्यात आला. तपासी अंमलदाराने घटनास्थळावर जावून दोन पंचासमक्ष पंचनामा केला, साक्षीदारांचे जबाब नोंदविले आणि तपास पुर्ण झाल्यावर आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

६. माझ्या पुर्वाधिका–यांनी दोषारोप(नि.१०) अन्वये आरोपीविरुध्द दोषारोप निश्चित केला. सदर दोषारोपातील सर्व मजकूर आरोपीस त्याच्या मातृभाषेत वाचुन दाखवण्यात आला असता, त्याने गुन्हा नाकबुल करुन, खटल्यास सामोरे जाण्याची तयारी दाखवली, त्यामुळे खटला पुढे चालविण्यात आला.

**७.** मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत,

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | सन २०२१ ते दिनांक ०३.०१.२०२४ अखेर ए–वन बिर्याणी सेंटर गाडीवर सीबीएस स्टँण्ड कोल्हापूर येथे आरोपीने फिर्यादीच्या गाडीवर येवून बिर्याणी व मासे खावून फिर्यादीला पैसे न देता फिर्यादीला क्षती पोहोचवण्याची भिती घालून दमदाटी घालून बलादग्रहण केले आणि भारतीय दंड विधान कलम ३८४ नुसार गुन्हा केल्याचे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | ... **नाही.** |
| २. | सन २०२१ ते दिनांक ०३.०१.२०२४ अखेर ए–वन बिर्याणी सेंटर गाडीवर सीबीएस स्टँण्ड कोल्हापूर येथे आरोपीने फिर्यादीच्या गाडीवर येवून बिर्याणी व मासे खावून फिर्यादीला पैसे न देता फिर्यादीला मृत्यू किंवा जबर दुखापत करण्याची भिती घालून दमदाटी घालून बलादग्रहण केले आणि भारतीय दंड विधान कलम ३८६ नुसार गुन्हा केल्याचे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | ... **नाही.** |
| ३. | वरील तारीख वेळ व ठिकाणी आरोपीने फिर्यादीस प्रक्षोभीत करुन सार्वजनिक शांततेचा भंग होण्याच्या उद्वेशाने तसेच इतर कोणताही अपराध घडावा, या उद्वेशाने अपमान केला, त्यानुसार भारतीय दंड विधान कलम ५०४ प्रमाणे गुन्हा केला, हे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | ... **नाही.** |

नि.२०/ब.

| | | |
|---|---|---|
| ४. | वरील तारीख वेळ व ठिकाणी आरोपीने फिर्यादीस प्रक्षोभीत करुन फौजदारीपात्र धाकदपटशा दाखवला व त्यानुसार भारतीय दंड विधान कलम ५०६ प्रमाणे गुन्हा केला, हे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | **--- नाही.** |
| ५. | काय आदेश ? | **...आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात आले आहे.** |

## <u>कारणमीमांसा</u>

८. अभियोग पक्षाने स्वतःचे म्हणणे सिध्द करण्यासाठी सुरज अरुण धमोने, फिर्यादी (नि.क्र.१४). फिर्यादीने नि.क्र.१३ आणि १९ वर त्याची आणि आरोपीची न्यायालयाबाहेर तडजोड झाली आहे त्यामुळे खटला पुढे चालविण्याचा नाही आणि कोणतेही साखीदार तपासावयाचे नाहीत अशी तडजोड पुरसिस तसेच पुरावा बंद करण्याची पुरसिस अनुक्रमे दाखल केली आहे. त्यानुसार नि.क्र.१ वर आदेश करुन अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

९. फिर्यादीच्या साक्षीमध्ये आरोपीला दोषी धरण्याइतपत कोणताही पुरावा न्यायालयासमोर आलेला नसल्यामुळे आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३ प्रमाणेचे निवेदन अनावश्यक (dispense with) करण्यात आला आणि तसा आदेश नि.क्र.१ वर करण्यात आला.

**<u>मुद्दे क्र.१ ते ४ करिता,</u>**

**१०.** सदर मुद्दे हे परस्परांशी निगडीत असल्यामुळे, त्यांची कारणमिमांसा

एकत्रीतपणे करण्यात आली हे. फिर्यादीने आपल्या सरतपासात(नि.१४) असे नमूद केले आहे की, त्याचे मध्यवर्ती बसस्थानक येथे 'ए–वन बिर्याणी' नावाचे दुकान आहे. दुकानाची वेळ दुपारी ४.०० ते रात्री ११.०० आहे. आरोपी त्याचा मित्र आहे. त्याच्या दुकानावर बाहेरच्या लोकांची भांडणे झाली होती. आरोपीविरुध्द त्याने सरतपासात काही सांगितले नाही. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १६४ नुसार नोंदविलेलया त्याच्या जबाबामध्ये त्याने काय सांगितले होते हे त्याला आठवत नसल्याचे कथन केले. फिर्यादीत काय मजकूर लिहीला आहे याबाबत माहिती नाही असे सांगितले. केवळ फिर्यादीवर व तसेच फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम १६४ नुसार नोंदविलेल्या त्याच्या जबाबावर त्याची सही आहे, एवढेच कथन त्याने सरतपासात केले आहे. सरकारी पक्षाला सहकार्य केले नाही. त्यामुळे सरकार पक्षातर्फे त्याचा उलटतपास घेण्यात आला, परंतु त्यातुनही आरोपीविरुध्द काहीही निष्पन्न झाले नाही.

**११**. फिर्यादीच्या सरतपास आणि उलटपतासावरुन त्याची आणि आरोपीची न्यायालयाबाहेर तडजोड झाली आहे असे स्पष्ट होते आणि त्यामुळे फिर्यादीने नि.क्र.१३ वर तशी पुरसिस दाखल केली आहे आणि आता आरोपीविरुध्द त्याची काहीही तक्रार राहिलेली नाही असे कथन पुरसिसमध्ये केले आहे.

**१२**. वरील विवेचनावरुन असे स्पष्ट होते की, फिर्यादी व आरोपी यांची तडजोड झालेली असल्यामुळे फिर्यादीने आरोपीविरुध्द काहीही सांगितलेले नाही. त्यामुळे फिर्यादीने आरोपी त्याच्या दुकानात येवून बिर्याणी व मासे खावून पैसे न देता जात होता, त्याला धमक्या देत होता या कोणत्याही बाबी न्यायालयासमोर सिध्द झालेल्या नाहीत. त्यामुळे आरोपीवरील गुन्हा सिध्द करण्यास अभियोग पक्ष असमर्थ ठरला आहे. सबब मुद्दा क्र. १ ते ४ चे निष्कर्ष नकारार्थी देण्यात येतात

आणि त्याअनुषंगाने मुद्दा क्र.५ चे उत्तर येते त्यासाठी खालील आदेश पारित करण्यात येत आहे,

## आदेश

१. आरोपी आकाश आनंद भोसले याची भारतीय दंड सहीता,१८६० चे कलम ३८४, ३८६, ५०४, व ५०६ नुसार ठेवलेल्या गुन्ह्यांतुन फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम २४८(१) नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचे वैयक्तीक जातमुचलका व जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ नुसार जामीन दयावा.

Digitally signed by KASHYAP MANGAL DEEPAK
Date: 2026.07.15 13:13:13 +0530

कोल्हापूर. **(मंगल दीपक कश्यप)**

दिनांकः १५.०७.२०२६ मुख्य न्यायदंडाधिकारी, कोल्हापूर.

नि.२०/ब.

## सारांश

| | | |
|---|---|---|
| १. | गुन्हा घडलेली तारीख | सन २०२१ ते ०३.०१.२०२६ पर्यंत |
| २. | प्रथम खबर | ०६.०१.२०२४ |
| ३. | दोषारोप पत्र दाखल तारीख | २२.०१.२०२५ |
| ४. | दोषारोप तारीख | १८.०६.२०२५ |
| ५. | पुरावा सुरु झालेची तारीख | १४.०७.२०२६ |
| ६. | कोणत्या तारखेला निकालासाठी ठेवले | -- |
| ७. | निकाल तारीख | १५.०७.२०२६ |
| ८. | शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | नाही. |

## आरोपी विषयी माहिती

| अ. क्र. | आरोपींची नावे | अटक तारीख | जामीनावर सुटलेली तारीख | केलेले गुन्हे | निर्दोष किंवा शिक्षा | दिलेली शिक्षा | फौजदारी दंड संहितेच्या कलम ४२८ साठी खटल्यादरम्यान ताब्यात घेतलेला कालावधी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | आकाश आनंदा भोसले | ०६.०१.२०२४ | १७.०१.२०२४ | भा. द. वि. सं. कलम ३८४, ३८६, ५०४, व ५०६ | निर्दोष मुक्तता | .... | .... |

नि.२०/ब.

**<u>फिर्यादी/बचाव/ न्यायालयीन साक्षीदारांची यादी</u>**

**(अ) – <u>अभियोग पक्षातर्फे साक्षी यादी</u> –**

| अ.क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | सुरज अरुण धमोणे (अ.सा.१) | फिर्यादी(नि.१४) |

(ब) – बचाव पक्षातर्फे साक्षीदार – निरंक

(क) – न्यायालया तर्फे साक्षीदार – निरंक

**<u>फिर्यादी/बचाव/ न्यायालयीन निशाणी क्रमांक</u> –**

(अ) – अभियोग पक्षातर्फे निशाणी –

| अ.क्र. | तपशिल | निशाणी |
|---|---|---|
| | निरंक | |

(ब) – बचाव पक्षातर्फे निशाणी – निरंक

(क) – न्यायालयातर्फे निशाणी – निरंक

(ड) – भौतिक वस्तू – निरंक

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by KASHYAP MANGAL DEEPAK
Date: 2026.07.15 13:13:29 +0530

कोल्हापूर.

**(मंगल दीपक कश्यप)**

दिनांकः १५.०७.२०२६

मुख्य न्यायदंडाधिकारी, कोल्हापूर